# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## 2019-20

### क्रमांक : साप्रवि/एफजीआर/18 दिनांक 11.09.2019

विषय : सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक 01 जानेवारी 2016 रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतन धारकांचे निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतन लाभ सुधारीत करुन बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन)नियम, 1953 मध्ये सुधारणा करण्याबाबत...

संदर्भ : 1)परिपत्रक क्रमांक साप्रवि/एफजीआर/06 दिनांक 02.06.2012
2) अधिसुचना वित्त विभाग क्रमांक : वेपुर-2019/प्र.क्र.1/सेवा-9 दि.30.01.2019
3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: सेनिवे-2019 /प्र.क्र.58/सेवा-4 दि.01.03.2019
4) विधी समिती ठराव क्र59 दि.29.07.2019
5) स्थायी समिती ठराव क्र.556 दि.02.08.2019
6) महानगरपालिका ठराव क्र.772 दि.29.08.2019

केंद्र शासनाच्या सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे महाराष्ट्र राज्य शासनाने विविध शासन निर्णयान्वये निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनामध्ये/ कुटुंब निवृत्तिवेतनामध्ये सुधारणा करून त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन / सेवा उपदान / मृत्यु उपदान नियमित करणारे नियम आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, 1984 यांमध्ये सुधारणा केल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे निवृत्तिवेतन विषयक नियम सर्वसाधारणपणे राज्य शासनाच्या धर्तीवर आधारित असतात. त्यामुळे संदर्भाधीन विधी समिती/ स्थायी समिती/ महानगरपालिका ठरावानुसार महानगरपालिकेच्या निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन सुधारित करून बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मध्ये सोबत जोडलेल्या जोडपत्र-1 नुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**<u>अंमलबजावणीचा दिनांक</u> :-**

2. संदर्भाधीन शासन निर्णयातील निर्देशांनुसार सुधारित तरतुदी दिनांक 01 जानेवारी 2016 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणा-या /झालेल्या / सेवेत असताना मृत्यु पावलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना / त्यांच्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना लागू होतील.

J-38713 (1-14)

3. दिनांक 01 जानेवारी 2016 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणा-या / मृत्यु पावलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना ज्या प्रकरणी निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन / उपदान / निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यापूर्वीच प्राधिकृत करण्यात आले आहे किंवा अदयापी प्राधिकृत करावयाचे आहेत अशा प्रकरणी ते या परिपत्रकानुसार सुधारीत करण्यात येतील.

दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2018 पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या महानगरपालिका कर्मचा-यांची निवृत्तिवेतन प्रकरणे प्रथम असुधारित वेतन (सहाव्या वेतन आयोगानुसार), असुधारित नियमानुसार तयार करुन सादर करावीत. सदरची प्रकरणे पुन्हा या तरतुदीन्वये (सातव्या वेतन आयोगानुसार) सुधारीत करून, प्रमुख लेखापाल (कोषागार) कार्यालयाकडे सादर करावीत.

**<u>वेतन</u>:-**

4. निवृत्तिवेतन विषयक विविध लाभांच्या परिगणनेसाठी सुधारीत वेतन संरचनेत "मुळ वेतन" या संज्ञेचा अर्थ म्हणजे महानगरपालिका कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकास / मृत्युच्या दिनांकास सातव्या वेतन आयोगानुसार विहीत पे मॅट्रीक्स मध्ये आहरीत करीत असलेले वेतन असा राहील.

सुधारीत निवृत्तिवेतनाची परिगणना करताना त्यामध्ये व्यवसायरोध भत्त्याचा समावेश करण्याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

**<u>निवृत्तिवेतन</u> :-**

5. बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नुसार दहा वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यास निवृत्तिवेतन देय नाही. परंतु अशा प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953, नियम 57(1) नुसार सेवेच्या प्रमाणात सेवा उपदान देय ठरेल. हे लाभ केवळ स्थायी / स्थायीकरणाचे लाभ दिलेल्या महानगरपालिका कर्मचा-यास लागू राहतील.

5.1 सहाव्या वेतन आयोगानुसार दि.01.07.2005/ दि.01.01.2006 पासून बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम 1953, मधील नियम 48 (2) (अ) नुसार पूर्ण निवृत्तिवेतनासाठी 33 वर्षाच्या किमान अर्हताकारी सेवेची आवश्यकता नसून महानगरपालिका कर्मचा-याने 20 वर्षाची किमान अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर नियत वयोमान, पुर्णसेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृतीच्या शेवटच्या 10 महिन्यात अर्जित केलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या 50% किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या 50% यापैकी जी रक्कम त्याला

9.38713

लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर तरतुद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे.

5.2 सहाव्या वेतन आयोगानुसार दि.01.07.2005/ दि.01.01.2006 पासून बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम 1953 मधील नियम 48 (2) (ब) नुसार दहा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु वीस वर्षापेक्षा कमी एवढी अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर नियत वयोमान, पूर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणा-या महानगरपालिका कर्मचा-यास त्याने सेवानिवृत्तिच्या शेवटच्या 10 महिन्यात अर्जित केलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या 50% किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या 50% यापैकी जी रक्कम त्याला लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर तरतुद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे.

5.3. सहाव्या वेतन आयोगानुसार दि.01.07.2005/ दि.01.01.2006 पासून अर्हताकारी सेवेचा किमान कालावधी 20 वर्षे इतका करण्यात आल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नुसार अर्हताकारी सेवेत भर घालण्याची तरतुद रद्द करण्यात आली आहे. सदर अर्हताकारी सेवेत भर न घालण्याची तरतूद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे. या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील विभाग चौदा (ह), हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला आहे, असे समजण्यात यावे.

5.4 निवृत्तिवेतनाची कमाल मर्यादा सुधारित वेतन संरचनेतील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या 50% अशी राहील. (उच्चतम वेतन दिनांक 01.01.2016 पासून रुपये 2,20,000/- असे आहे.)

**<u>सेवानिवृत्ति उपदान / मृत्यु उपदान :-</u>**

6. उपरोक्त अनुक्रमांक 4 मध्ये नमुद केलेल्या सुधारीत मूळ वेतनावर निवृत्ति उपदानाची परिगणना करण्यात येईल. बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील नियम 57 (1) अन्वये, दिनांक 01.01.2016 नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या सेवानिवृत्ति नंतर अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरीता त्याच्या सुधारीत वेतनाच्या एक चतुर्थांश इतके तथापि सुधारीत वेतनाच्या कमाल 16 ½(साडे सोळा) पट किंवा रु.14 लक्ष यापैकी जे कमी असेल ते सेवानिवृत्ति उपदान म्हणून देय राहील.

6.1 दिनांक 01.01.2016 व तदनंतर सेवेत असताना महानगरपालिका कर्मचा-याचे निधन झाल्यास, त्याच्या कुटुंबाला अनुज्ञेय असणा-या मृत्यू उपदानाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नियम 57 (2) मधील तक्त्यामध्ये खालील प्रमाणे बदल प्रस्ताविण्यात येत

J-38713

आहेत. या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नियम 57 (2) मधील तक्ता हा दिनांक 01.01.2016 पासून सुधारण्यात आला आहे, असे समजण्यात यावे. तसेच मृत्यु उपदानाची कमाल मर्यादा रु.14 लक्ष इतकी राहील.

| अर्हताकारी सेवेचा कालावधी | मृत्यु उपदानाचा दर |
|---|---|
| सेवा 1 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| सेवा 1 वर्षापेक्षा जास्त व 5 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या 6 पट |
| सेवा 5 वर्षापेक्षा जास्त व 11 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या 12 पट |
| सेवा 11 वर्षापेक्षा जास्त व 20 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या 20 पट |
| सेवा 20 वर्षापेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी अंतिम वेतनाच्या निम्मे मात्र अंतिम वेतनाच्या 33 पटीच्या मर्यादित |

स्थायी समिती ठराव क्र.2903 दि.5 जानेवारी 1979, महानगरपालिका ठराव क्र.1834 दि.01 फेब्रुवारी 1979 नुसार उपदान अधिदान अधिनियम 1972 च्या तरतुदी दि. 16 सप्टेंबर 1972 पासून म्हणजे हा कायदा अंमलात आल्याच्या तारखेपासून महानगरपालिका कर्मचा-यांना लागू करण्यास तसेच निवृत्तिवेतन नियमानुसार अनुज्ञेय असलेले उपदान आणि उपदान अधिदान अधिनियम 1972 नुसार उपदान यातील लाभदायक फरक महानगरपालिका कर्मचा-यांना देय करण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम,1953 नुसार अनुज्ञेय असलेले उपदान किंवा उपदान अधिदान अधिनियम 1972 नुसार उपदान यापैकी जे जास्त असेल ते उपदान महानगरपालिका कर्मचा-यांना अनुज्ञेय आहे. उपदान अधिदान अधिनियम, 1972 मधील उपदानाच्या कमाल मर्यादेत केंद्र शासनाने क्र.S-42012/02/2016-SS-II दि.29 मार्च 2018 च्या प्रभावाने रु.20 लाख इतकी वाढ करण्यात आली आहे. याबाबतच्या सूचना स्वतंत्ररित्या परिपत्रकाद्वारे प्रसारित करण्यात येतील.

## कुटुंब निवृत्तिवेतन :-

7. कुटुंब निवृत्तिवेतनाची परिगणना निवृतीवेतनार्ह वेतनाच्या 30 टक्के अशा एकरुप दराने करण्यात येईल व या कुटुंब निवृत्तिवेतनाची कमाल मर्यादा उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या 30 टक्के अशी राहील. (उच्चतम वेतन दिनांक 01.01.2016 पासून रुपये 2,20,000/- असे आहे.)

7.1 सेवेत असताना मृत्यु पावलेल्या महानगरपालिका कर्मचा-याच्या वारसांना बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील नियम 88 (3) (ब) (एक) मधील तरतुदीन्वये, दिनांक 01 जानेवारी 2016 पासून संबंधीत कर्मचा-याच्या मृत्यु दिनांकानंतरच्या दिनांकापासून 10

J.38713

वर्षापर्यंत वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळेल. याकरीता असलेली वयाची अट रद्द करण्यात येत आहे. या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील नियम 88 (3) (ब) (एक) हा त्या मर्यादेपर्यंत यापुर्वीच सुधारित केला आहे.

7.2 महानगरपालिका कर्मचा-याचा मृत्यु सेवानिवृत्तिनंतर झाल्यास त्याच्या वारस / वारसांना वाढीव दराने कुटुंब निवृत्तिवेतन देण्याच्या कालावधीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील नियम 88 (3) (ब) (दोन) मध्ये असलेल्या तरतुदीमध्ये कोणताही बदल नाही.

**निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण :-**

8. सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणा-या मूळ निवृत्तिवेतनावरील अंशराशीकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील नियम 65(अ) नुसार महानगरपालिका कर्मचा-याला, त्याच्या निवृत्तिवेतनाच्या 40% यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे, एका ठोक रकमेतील प्रदानासाठी जोडपत्र-2 मध्ये दिलेल्या दरानुसार अंशराशीकरण करता येईल. *सदर लाभ केवळ दिनांक 01 जानेवारी 2019 पासून अस्तित्वात येतील व सदर दिनांकास अथवा तदनंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना लागू होतील.*

8.1 अंशराशीकरणाचे सुत्र पुढीलप्रमाणे आहे-

मुळ निवृत्तिवेतन X 40% X 12 X अंशराशीकरणाच्या सुधारीत तक्त्यानुसार (जोडपत्र-2) कर्मचा-याच्या मूळ अर्जाच्या दिनांकाच्या पुढील जन्मदिनी होणा-या वयाकरिता निश्चित केलेले अंशराशीकृत मुल्य.

8.2 *जे कर्मचारी दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2018 पर्यंत सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणा-या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देय असणार नाही.*

**महागाई वाढ:-**

9. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित झालेल्या महानगरपालिका निवृत्तिवेतन व कुटुंबनिवृत्तिवेतनावर तसेच सुधारित वेतन संरचनेत अनुज्ञेय होणा-या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनावर दिनांक 01 जानेवारी 2016 पासून पुढे दर्शविलेल्या दराने महागाई वाढ देय होईल.

| अनु. क्र. | कालावधी | महागाई वाढीचा दर |
|---|---|---|
| 1 | दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 30 जुन 2016 पर्यंत | 0 % |
| 2 | दिनांक 01 जुलै 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2016 पर्यंत | 2 % |
| 3 | दिनांक 01 जानेवारी 2017 ते दिनांक 30 जुन 2017 पर्यंत | 4 % |
| 4 | दिनांक 01 जुलै 2017 ते दिनांक 31 डिसेंबर 2017 पर्यंत | 5 % |
| 5 | दिनांक 01 जानेवारी 2018 ते दिनांक 30 जुन 2018 पर्यंत | 7 % |
| 6 | दिनांक 01 जुलै 2018 पासून पुढे | 9 % |

J.38713

**थकबाकी:-**

10. दि.01.01.2016 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणा-या / झालेल्या / सेवत असताना मृत्यू पावलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांचे वेतन सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतन संरचनेनुसार निश्चित करुन त्यानुसार निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन सुधारित करावे. तथापि, त्याचा प्रत्यक्ष लाभ सर्व निवृत्तिनिवेतनधारकांना / कुटुंब निवृत्तिनिवेतनधारकांना दिनांक 01.01.2019 पासून रोखीने अदा करण्यात यावा. दि.01.01.2016 ते दि.31.12.2018 पर्यंतच्या कालावधीतील थकबाकीची रक्कम 2 वर्षात 2 समान हस्यात, वसुलीची रकम असल्यास ती समायोजित करुन, रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा करण्यात यावी. सन 2019 मध्ये अदा करावयाचा पहिला हप्ता माहे जून 2019 / मंजुरीच्या नजीकच्या मासिक निवृत्तिवेतनासोबत प्रदान करण्यात यावा. तसेच उर्वरीत हप्ता पुढील वर्षी माहे जूनच्या मासिक निवृत्तिवेतनासोबत अदा करावा. नियमानुसार आयकर कपातीची कार्यवाही करावी.

10.1 निवृत्तिवेतन सुधारीत झाल्यामुळे देय ठरणा-या सेवा-नि-मृत्यू उपदानाच्या फरकाच्या थकबाकीची रक्कम एकरकमी रोखीने अदा करण्यात यावी.

11. दिनांक 01.01.2016 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या / होणा-या / सेवेत असताना मृत्यु पावलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांच्या बाबतीत निवृत्तिवेतनविषयक लाभांचे निर्धारण, प्राधिकृती, संवितरण याबाबत तसेच नियमानुसार आयकर कपात करुन त्याचा भरणा करण्यासंबंधीची कार्यवाही करण्यास प्रमुख लेखापाल (कोषागार) यांना प्राधिकृत करण्यात येत असून याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मध्ये विहित केलेली नेहमीची कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

12. ज्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना असुधारीत वेतनावर आधारित तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन विषयक लाभ, सद्यस्थितीत, बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 च्या नियम 44, 45 (अ) च्या तरतुदीनुसार मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यांचे तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन विषयक लाभ वरील आदेशानुसार तात्पुरत्या स्वरुपात सुधारीत करण्यात यावेत.

13. निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांच्या कायदेशीर वारसदार / वारसदारांना दि.01.01.2016 रोजी पासून निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या मृत्यू दिनांकपर्यंतची सुधारित निवृत्तिवेतन तसेच सुधारीत सेवा-नि-मृत्यू उपदानाच्या फरकाची थकबाकी मिळण्याचा देखिल अधिकार असेल. या प्रयोजनासाठी कायदेशीर वारसदारांना महानगरपालिका कर्मचारी जेथून सेवानिवृत्त झाला असेल किंवा त्याच्या मृत्युपूर्वी तो जेथे कार्यरत असेल त्या विभाग प्रमुखाकडे / खातेप्रमुखाकडे अर्ज करावा. हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा असल्यास त्या समायोजित करुन एकाच हस्यात त्यांच्या कायदेशीर वारसास रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा

J.38713

करण्यात यावी. त्याचप्रमाणे सुधारीत निवृत्तिवेतन फरकाच्या थकबाकीचे एक किंवा अधिक हप्ते रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा केल्यानंतर मृत्यु पावलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीत उर्वरीत थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास त्यातून प्रलंबित वसुलीच्या रकमा समायोजित करुन एकाच हफ्त्यात कायदेशीर वारसास रोखीने (प्रचलित पद्धत अनुसरून) अदा करण्यात यावी.

14. बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदीमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील ज्या तरतुदीमध्ये या आदेशान्वये स्पष्टपणे सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत त्या अबाधित राहतील.

15. सन 2019-20 या आर्थिक वर्षासाठी निवृत्तिवेतनादी फायदयांच्या थकबाकीच्या अधिदानासाठी निधी संकेतांक (Fund Code) 70, निवृत्तिवेतन या अंतर्गत GL Code 210300801 या लेखा संकेतांक अंतर्गत रु.100 कोटी एवढी तरतुद करण्यात आली आहे.

16. असे निदर्शनास आले आहे की, निवृत्त झालेल्या / मृत्यू पावलेल्या/ सेवा समाप्त झालेल्या सर्व कर्मचा-यांचे निवृत्तीवेतनाचे दावे स्पष्ट सूचना देऊनही वेळीच सुधारित वेतनश्रेणीनुसार परिगणनासाठी प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या कार्यालयात सादर केले जात नाहीत. काही प्रकरणी असेही निदर्शनास आले आहे की, सेवानिवृत्तांचे दावे योग्य त-हेने जतन / परिरक्षित केले जात नाहीत वा गहाळ होतात. परिणामी ब-याच निवृत्त कर्मचा-यांना, त्यांच्या वारसांना सेवानिवृत्तीचे / फरकाचे अधिदान होण्यास अतिशय विलंब होतो.

17. अशा प्रलंबित प्रकरणी माहितीचा अधिकार / लोक अदालत / लोक आयुक्त / न्यायालये, इ. संस्थांकडून मनपा प्रशासनावर ताशेरे ओढले जातात. आस्थापना कर्मचा-यांच्या अशा निष्काळजीपणामुळे मनपा प्रशासनाची नाहक बदनामी होऊन प्रतिमा मलीन होते.

18. सर्व खाते प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांना याद्वारे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांच्या खात्यामध्ये सेवानिवृत्त / सेवा समाप्त झालेल्या सर्व कर्मचा-यांचे निवृत्ती वेतनाचे दावे सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर त्वरीत पुढील कार्यवाहीसाठी प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या कार्यालयात सादर करावेत. दावे / कागदपत्रे उपलब्ध नसल्यास / उपलब्ध होत नसल्यास तसा अहवाल त्वरीत प्रमुख लेखापाल (कोषागार) यांना सादर करावा व नविन कागदपत्रे तयार करण्याबाबतची कार्यवाही संबंधित नियमानुसार करावी. या बाबतीत यथोचित कार्यवाही करण्यास दिरंगाई झाल्यास अथवा अधिदानास विलंब झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येऊन दिरंगाईस जबाबदार असणा-या आस्थापना विभागातील संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. याची सर्व खाते प्रमुख, अधिष्ठाता

J.38713

रुग्णालये व सहाय्यक आयुक्त यांनी नोंद घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना संबंधित कर्मचारीवृंदांना द्याव्यात.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या Intranet वर ftp://45.249.109.226/Circulars/GAD/ Dy.CA. Estt- II या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-दि.30.08.2019
श्री.अशोक दा. रुपवते
उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)

सही/-दि.31.08.2019
श्रीम.सुलोचना कवडे
प्रमुख लेखापाल (कोषागार)

सही/-दि.31.08.2019
श्री.प्रदिप पडवळ
प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.

सही/-दि.03.09.2019
श्री.मिलिन सावंत
सह आयुक्त (सा.प्र.)

सही/-दि.03.09.2019
श्री.ए.एल.ज-हाड
अति.आयुक्त (शहर)

सही/-दि.04.09.2019
श्री. प्रविण दराडे
अति.आयुक्त (प्रकल्प)

सही/-दि.07.09.2019
श्री.प्रवीण परदेशी
मा.महानगरपालिका आयुक्त

परिपत्रक
2019-20
क्रमांकः साप्रवि/एफजीआर/18 दिनांक 11.09.2019

प्रत ------------------------------------------ यांना ( ----- ज्यादा प्रतींसह) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

11/9/2019

उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) करिता

J.38713

## जोडपत्र-1

| विद्यमान नियम | प्रस्तावित नियम |
|---|---|
| नियम 5(1)(इ)<br>निवृत्तिवेतनविषयक विविध लाभांच्या परिगणनेसाठी सुधारित वेतन संरचनेत `मूळ वेतन` या संज्ञेचा अर्थ महानगरपालिका कर्मचारी त्याच्या निवृत्तिपूर्वी / मृत्यूच्या लगतच्या दिनांकापूर्वी सुधारित वेतनश्रेणीनुसार विहित पे बँडमध्ये प्राप्त करीत असलेले वेतन अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन असा राहिल. त्यामध्ये विशेष वेतनाचा समावेश नसेल. तथापि, मूळ वेतनामध्ये व्यवसायरोध भत्त्याचा समावेश होईल. | नियम क्र.5(1)(इ)<br>निवृत्तिवेतन विषयक विविध लाभांच्या परिगणनेसाठी सुधारीत वेतन संरचनेत "मुळ वेतन" या संज्ञेचा अर्थ म्हणजे महानगरपालिका कर्मचारी त्याच्या सेवानिवृत्तिच्या दिनांकास / मृत्युच्या दिनांकास सातव्या वेतन आयोगानुसार विहीत पे मॅट्रीक्स मध्ये आहरीत करीत असलेले वेतन असा राहील.<br>सुधारीत निवृत्तिवेतनाची परिगणना करताना त्यामध्ये व्यवसायरोध भत्त्याचा समावेश करण्याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. |
| नियम 48(2)(अ)<br>पूर्ण निवृत्ति वेतनासाठी दि. 27 फेब्रुवारी 2009 पासून 33 वर्षांच्या किमान अर्हकारी सेवेची आवश्यकता नसून महानगरपालिका कर्मचा-याने वीस वर्षांची किमान अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत्तिच्या शेवटच्या दहा महिन्यात त्याला देय असलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या 50 टक्के किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या 50 टक्के यापैकी जी रक्कम त्याला लाभदायक ठरेल ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय होईल. | नियम 48(2)(अ)<br>पूर्ण निवृत्ति वेतनासाठी दि.01.07.2005 / दि.01.01.2006 पासून 33 वर्षांच्या किमान अर्हकारी सेवेची आवश्यकता नसून महानगरपालिका कर्मचा-याने 20 वर्षांची किमान अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत्तिच्या शेवटच्या दहा महिन्यात त्याला देय असलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या 50% किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या 50% यापैकी जी रक्कम त्याला लाभदायक ठरेल ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय होईल. |
| नियम 48(2)(ब)<br>दि. 27.02.2009 पासून 10 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु 20 वर्षापेक्षा कमी एवढी अर्हकारी सेवा पूर्ण केल्यावर नियतवयोमान, पूर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणा-या महानगरपालिका कर्मचा-यास सेवा निवृत्तिच्या शेवटच्या 10 महिन्यांत देय असलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या 50 टक्के किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या 50 टक्के यापैकी त्याला जी रक्कम लाभदायक ठरेल ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय होईल. | नियम 48(2)(ब)<br>दि.01.07.2005/ दि.01.01.2006 पासून 10 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु 20 वर्षापेक्षा कमी एवढी अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर नियतवयोमान, पूर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणा-या महानगरपालिका कर्मचा-यास सेवा निवृत्तिच्या शेवटच्या 10 महिन्यांत देय असलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या 50% किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या 50% यापैकी त्याला जी रक्कम लाभदायक ठरेल ती रक्कम निवृत्तिवेतन म्हणून अनुज्ञेय होईल. |

J·38713

| | |
|---|---|
| नियम 57<br>सेवा निवृत्ति उपदान<br>(1) सेवानिवृत्ति उपदान<br>दि.01.07.2005/ दि.1.1.2006 रोजी किंवा त्यानंतर व 1 सप्टेंबर 2009 (मध्यान्हपूर्व) पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या अर्हकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरिता त्यांच्या मूळ वेतनाच्या 1/4 (कमाल 16.5 पट) किंवा रु.5 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल इतके निवृत्ति उपदान अनुज्ञेय राहिल. दि.1 सप्टेंबर 2009 रोजी (मध्यान्हनंतर) किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांकरिता त्यांच्या अर्हकारी सेवेच्या प्रत्येक सहामाही कालावधीकरिता त्यांच्या मूळ वेतनाच्या 1/4(कमाल 16.5 पट ) किंवा रु.7 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल इतके निवृत्ति उपदान अनुज्ञेय राहील. | नियम 57<br>सेवा निवृत्ति उपदान<br>(1) सेवानिवृत्ति उपदान<br>ज्या महानगरपालिका कर्मचा-याने अर्हकारी सेवेची पाच वर्षे पूर्ण केलेली आहेत आणि ज्याला सेवानिवृत्तिनंतर नियम 48 अन्वये सेवा उपदान किंवा निवृत्ति वेतन अनुज्ञेय आहे, अशा दि.01.01.2016 नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या सेवानिवृत्ति नंतर अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरीता त्याच्या सुधारीत वेतनाच्या एक चतुर्थांश इतके तथापि सुधारीत वेतनाच्या कमाल 16 ½ (साडे सोळा) पट किंवा रु.14 लक्ष यापैकी जे कमी असेल ते सेवानिवृत्ति उपदान म्हणून देय राहील. |
| (2) मृत्यू उपदान<br>दि.1.7.2005/दि.01.01.2006 रोजी किंवा त्यानंतर परंतु दि.31.8.2009 पर्यंत सेवेत असताना महापालिका कर्मचा-याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबाला मुंबई महानगरपालिका निवृत्तिवेतन नियम 1953 मधील नियम क्र.57(2) मध्ये नमूद केलेल्या दराने किंवा रु.5 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल तितके मृत्यू-उपदान अनुज्ञेय असेल. दि.01 सप्टेंबर 2009 रोजी किंवा त्यानंतर सेवेत असताना महानगरपालिका कर्मचा-याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबाला मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 मधील क्र.57(2) मध्ये नमूद केलेल्या दराने किंवा रु.7 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल तितके मृत्यू उपदान अनुज्ञेय राहील. | (2) मृत्यू उपदान<br>दिनांक 01.01.2016 व तदनंतर सेवेत असताना महानगरपालिका कर्मचा-याचे निधन झाल्यास, त्याच्या कुटुंबाला अनुज्ञेय असणा-या मृत्यू उपदानाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नियम 57 (2) मधील तक्त्यामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत. |

J.38713

| अर्हकारी सेवेची पूर्ण केलेली वर्षे | मृत्यू उपदानाचा दर (प्रमाण) |
|---|---|
| एक) एक वर्षापेक्षा कमी | वेतनाच्या दुप्पट |
| दोन)एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त परंतु पाच वर्षापेक्षा कमी | वेतनाच्या सहा पट |
| तीन) पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु वीस वर्षापेक्षा कमी | वेतनाच्या बारा पट |
| चार) वीस वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त | अर्हकारी सेवेच्या पूर्ण झालेल्या प्रत्येक सहा महिन्यांसाठी अर्धे वेतन परंतु जास्तीत जास्त वेतनाच्या 33 पट मात्र उपदानाची रक्कम कोणत्याही प्रकरणी रु.5,00,000 पेक्षा जास्त होता कामा नये.(प्रभावाचा दि. 01.07.2005/ दि. 01.01.2006) उपदानाची रक्कम कोणत्याही प्रकरणी रु.7 लाख पेक्षा जास्त होता कामा नये (प्रभावाचा दि.01.09.2009) |

| अर्हताकारी सेवेचा कालावधी | मृत्यु उपदानाचा दर |
|---|---|
| सेवा 1 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| सेवा 1 वर्षापेक्षा जास्त व 5 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या 6 पट |
| सेवा 5 वर्षापेक्षा जास्त व 11 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या 12 पट |
| सेवा 11 वर्षापेक्षा जास्त व 20 वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या 20 पट |
| सेवा 20 वर्षापेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी अंतिम वेतनाच्या निम्मे मात्र अंतिम वेतनाच्या 33 पटीच्या मर्यादेत |

मृत्यु उपदानाची कमाल मर्यादा रु. 14 लक्ष इतकी राहील.

**नियम क्र. – विभाग चौदा (ह)**

दि.27 फेब्रुवारी 2009 पासून अर्हकारी सेवेचा किमान कालावधी 20 वर्षे इतका करण्यात आल्यामुळे स्वेच्छा सेवानिवृत्तिच्या बाबतीत अर्हकारी सेवेत भर घालण्याची तरतूद दिनांक 27.2.2009 पासून रद्द करण्यात येत आहे.

**नियम क्र. – विभाग चौदा (ह)**

सहाव्या वेतन आयोगानुसार दि.01.07.2005 / दि.01.01.2006 पासून अर्हताकारी सेवेचा किमान कालावधी 20 वर्षे इतका करण्यात आल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका (निवृत्तिवेतन) नियम, 1953 नुसार अर्हताकारी सेवेत भर घालण्याची तरतुद रद्द करण्यात आली आहे. सदर अर्हताकारी सेवेत भर न घालण्याची तरतूद सातव्या वेतन आयोगात देखील अबाधित ठेवण्यात येत आहे.

J·38713

| | |
|---|---|
| **नियम क्र.88(3)(अ)**<br>कुटुंब निवृत्तिवेतनाची परिगणना मूळ वेतनाच्या 30 टक्के अशा एकरुप दराने करण्यात येईल व या कुटुंब निवृत्तिवेतनाची कमाल मर्यादा महापालिकेतील उच्चतम अनुज्ञेय वेतन अधिक उच्चतम अनुज्ञेय ग्रेड वेतन यांच्या 30 टक्के अशी राहिल.(दि. 01.07.2005 पासून प्रभाव देण्यात येईल) | **नियम क्र.88(3)(अ)**<br>कुटुंब निवृत्तिवेतनाची परिगणना निवृत्तिवेतनार्ह वेतनाच्या 30 टक्के अशा एकरुप दराने करण्यात येईल व या कुटुंब निवृत्तिवेतनाची कमाल मर्यादा महापालिकेतील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या 30 टक्के अशी राहिल. (उच्चतम वेतन दि.01.01.2016 पासून रु.2,20,000/- असे आहे) |
| **नियम क्र.88(3)(ब)(एक)** अन्वये श्रमिक भरपाई अधिनियम 1923 (1923 चा 8 वा) लागू नाही अशा महानगरपालिका कर्मचारी सात वर्षाहून कमी नाही इतकी सलग (अखंडित) सेवा केल्यानंतर सेवेत असताना मृत्यू पावला तर, त्याला मिळालेल्या वेतनाच्या 50 टक्के रक्कम, किंवा पोटनियम (3) खंड (अ) नुसार अनुज्ञेय असणा-या कुटुंब निवृत्तिवेतनाच्या दुप्पट रक्कम, यापैकी जी कमी असेल त्या रकमेएवढा त्या कुटुंबाला देय होणा-या कुटुंब निवृत्तिवेतनाचा दर असेल. अशी अनुज्ञेय रक्कम, महानगरपालिका कर्मचा-याच्या मृत्यूच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून दहा वर्षांपर्यंत उच्च दराने कुटुंब निवृत्तिवेतन मिळेल. याकरिता असलेली वयाची अट रद्द करण्यात येत आहे. | बदल नाही. |
| **88(3)(ब)(दोन)**<br>महानगरपालिका कर्मचा-याच्या सेवानिवृत्ति नंतर मृत्यू झाल्यास, पोटकलम (ब) (एक) अनुसार, निर्धारित केलेले कुटुंब निवृत्तिवेतन सात वर्षांचा कालावधी किंवा सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचारी हयात राहिला असता तर ज्या दिनांकास तो 65 वर्षे वयाचा झाला असता त्या दिनांकापर्यंतचा कालावधी, यापैकी कमी असेल त्या कालावधीसाठी प्रदेय राहिल.<br>मात्र, कोणत्याही परिस्थितीत या खंडाच्या उपखंड (दोन) अनुसार निर्धारित केलेली कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम महापालिका सेवेतून निवृत्त झाल्यानंतर प्राधिकृत केलेल्या निवृत्ति वेतनाहून अधिक होता कामा नये. | बदल नाही. |

J-38713

| | |
|---|---|
| <u>नियम क्र.65(अ)</u><br>दि.27.2.2009 पासून महानगरपालिका कर्मचा-याला त्याच्या निवृत्तिवेतनाच्या 40 टक्के यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे, एका ठोक रकमेतील प्रदानासाठी सुधारित दराने (जोडपत्र-2 मध्ये दिलेल्या दरानुसार) अंशराशीकरण करता येईल. | <u>नियम क्र.65(अ)</u><br>सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणा-या मुळ निवृत्तिवेतनाच्या 40% यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे एका ठोक रकमेतील प्रदानासाठी जोडपत्र-2 मध्ये दिलेल्या दरानुसार अंशराशीकरण करता येईल.<br>सदर लाभ केवळ दि.01 जानेवारी 2019 पासून अस्तित्वात येतील व सदर दिनांकास अथवा तदनंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना लागू होतील.<br>जे कर्मचारी दिनांक 01 जानेवारी 2016 ते दिनांक 31 डिसेंबर 2018 पर्यंत सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणा-या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देय असणार नाही. |

J. 38713

## जोडपत्र-2

### दरवर्षी रु.एक या निवृत्तिवेतनासाठी अंशराशिकरण मूल्य

| वय पुढील जन्म दिवशी | खरेदीच्या वर्षाप्रमाणे दर्शविलेले अंशराशिकरण मूल्य | वय पुढील जन्म दिवशी | खरेदीच्या वर्षाप्रमाणे दर्शविलेले अंशराशिकरण मूल्य | वय पुढील जन्म दिवशी | खरेदीच्या वर्षाप्रमाणे दर्शविलेले अंशराशिकरण मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 20 | 9.19 | 41 | 9.075 | 62 | 8.093 |
| 21 | 9.187 | 42 | 9.059 | 63 | 7.982 |
| 22 | 9.186 | 43 | 9.040 | 64 | 7.862 |
| 23 | 9.185 | 44 | 9.019 | 65 | 7.731 |
| 24 | 9.184 | 45 | 8.996 | 66 | 7.591 |
| 25 | 9.183 | 46 | 8.971 | 67 | 7.431 |
| 26 | 9.182 | 47 | 8.943 | 68 | 7.262 |
| 27 | 9.180 | 48 | 8.913 | 69 | 7.083 |
| 28 | 9.178 | 49 | 8.881 | 70 | 6.897 |
| 29 | 9.176 | 50 | 8.846 | 71 | 6.703 |
| 30 | 9.173 | 51 | 8.808 | 72 | 6.502 |
| 31 | 9.169 | 52 | 8.708 | 73 | 6.296 |
| 32 | 9.164 | 53 | 8.724 | 74 | 6.085 |
| 33 | 9.159 | 54 | 8.678 | 75 | 5.872 |
| 34 | 9.152 | 55 | 8.627 | 76 | 5.057 |
| 35 | 9.145 | 56 | 8.572 | 77 | 5.443 |
| 36 | 9.136 | 57 | 8.512 | 78 | 5.229 |
| 37 | 9.126 | 58 | 8.446 | 79 | 5.018 |
| 38 | 9.116 | 59 | 8.371 | 80 | 4.812 |
| 39 | 9.103 | 60 | 8.287 | 81 | 4.611 |
| 40 | 9.090 | 61 | 8.194 | | |

NS 2435-CA-BMPP-38713-2019-20-1000